**नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी नसताना विकृतिचिकित्सा तपासण्यांचे अहवाल प्रमाणित करणाऱ्या व्यक्तींवर महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ च्या कलम ३३ अनुसार कारवाई करणेबाबत.**

# <u>महाराष्ट्र शासन</u>

**वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग**

शासन परिपत्रक क्र. एमएमपी-०५१६/प्र.क्र.२१/अधिनियम
९वा मजला, नवीन मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१.
दिनांक २४ मे, २०१६

**वाचा :-**

१) भारत सरकार, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, पत्र क्र. एस.११०२५/ १५१/ २००३२-एमएच/ पीएमएस, दिनांक १७.०२.२००६.

२) मा. मुंबई उच्च न्यायालयाने जनहिते याचिका क्र. २८/२००५, डॉ. प्रताप सिताराम पाटील व इतर विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणात दिनांक १०.१०.२००७ रोजी दिलेला अंतरिम आदेश.

३) शासकीय पत्र, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, क्र. एसयुटी-२००८/ ३४१/ प्र.क्र.१३७/ ०८/ अधिनियम, दिनांक २६.०७.२००८.

४) मा. मुंबई उच्च न्यायालयाने अवमान याचिका क्र. ११९/२००९, डॉ. मनोहर आर. जाधव व इतर विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर, या प्रकरणात दिनांक १५.१२.२०१० रोजी दिलेला आदेश.

५) शासकीय पत्र, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, क्र. डीएमएलटी-०८११/ प्र.क्र.२०७/ अधिनियम, दिनांक २३.०९.२०११.

६) पोलीस महासंचालक यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ २२/ ५२५२/ हिवा.अधि/ लक्षवेधी-सूचना/ ६६/ २०१५, दिनांक १४.१२.२०१५.

७) पोलीस महासंचालक यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ २२/ अर्थ.अधि/ विपलवेसू-१५८/ १४२/ २०१६, दिनांक ३१.०३.२०१६.

८) महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०१६ च्या प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशनात महाराष्ट्र विधानसभा नियम ९७ अनुसार देण्यात आलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेवरील मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री यांचे निवेदन.

९) महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०१६ च्या प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशनात विधानपरिषद नियम १०१ अनुसार देण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्र. १५६८ यावरील मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री यांचे निवेदन.

१०) शासकीय पत्र, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, क्र. संकीर्ण-०४१६/ प्र.क्र.१४/ अधिनियम, दिनांक ०७.०४.२०१६.

११) शासकीय पत्र, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, क्र. संकीर्ण-०५१६/ प्र.क्र.१९/ अधिनियम, दिनांक १२.०५.२०१६.

## परिपत्रक

महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (सन १९६१ चा महा. अधि. क्र.२८) च्या कलम २ च्या पोट-कलम (२) यामध्ये "वैद्यक व्यवसाय" या संज्ञेचा अर्थ स्पष्ट करण्यात आला आहे. त्या अनुसार विकृतिचिकित्सा तपासण्यांच्या द्वारे रोगनिदान करणे हा वैद्यक व्यवसाय ठरतो. अशा तपासण्या ह्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषद आणि भारतीय वैद्यकीय परिषद यांच्याकडे नोंदणीकृत असलेले विकृतिशास्त्रज्ञ (पॅथोलॉजिस्ट) यांच्या देखरेखीखाली करण्यात येणे अभिप्रेत आहे. अशा तपासण्यांचे अहवाल फक्त नोंदणीकृत विकृतिशास्त्रज्ञ (पॅथोलॉजिस्ट) प्रमाणित करु शकतात.

२. डी.एम.एल.टी. पदविका किंवा इतर तत्सम अर्हता धारण करणारे व्यक्ती हे विकृतिचिकित्सा प्रयोगशाळांमध्ये विकृतिशास्त्रज्ञ (पॅथोलॉजिस्ट) यांच्या सहायकांच्या भूमिकेत असणे अभिप्रेत आहे, असे भारत सरकारने दिनांक १७.०२.२००६ रोजीच्या संदर्भाधीन पत्राद्वारे स्पष्ट केले आहे. डी.एम.एल.टी. पदविका किंवा इतर तत्सम अर्हता धारण करणारे व्यक्ती हे तपासणीसाठी घेण्यात आलेल्या नमुन्यांचे स्वत: विश्लेषण करु शकतात व त्याच्या निकालाच्या नोंदी घेऊ शकतात. परंतु नोंदणीकृत विकृतिशास्त्रज्ञाची (वैध रीतीने) नियुक्ती न करता ते स्वतंत्रपणे विकृतिचिकित्सा प्रयोगशाळा चालवू शकत नाहीत.

३. तथापि, असे निदर्शनास आले आहे की नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी नसताना विकृतिचिकित्सा तपासण्यांचे अहवाल प्रमाणित करणाऱ्या व्यक्तींवर महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ च्या कलम ३३ अनुसार कारवाई करण्यात येत नाही. म्हणून आता, दिनांक २६.०७.२००८ व दिनांक २३.०९.२०११ रोजीच्या संदर्भाधीन शासकीय पत्रांचे अधिक्रमण करुन, याद्वारे, असे स्पष्ट करण्यात येते की,-

१) नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी असल्याखेरीज विकृतिचिकित्सा तपासण्यांचे अहवाल प्रमाणित करणे, हा अवैध वैद्यक व्यवसाय ठरतो;

२) उक्त अवैध वैद्यक व्यवसाय महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ च्या कलम ३३ च्या पोट-कलम (१) अनुसार प्रतिषिध्द आहे; आणि

३) उक्त कलम ३३ च्या पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करणे हा अपराध आहे व त्याकरिता उक्त कलम ३३ च्या पोट-कलम (२) मध्ये शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

४. हे शासकीय परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा संदर्भ क्रमांक २०१६०५२४१७०८५२८६१३ असा आहे. हे शासकीय परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sadashiv Sambhaji Benake

Digitally signed by Sadashiv Sambhaji Benake
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400001, st=Maharashtra, cn=Sadashiv Sambhaji Benake
Date: 2016.05.24 17:15:11 +05'30'

**(सदाशिव बेनके)**
शासनाचे उपसचिव.

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, वाळकेश्वर मार्ग, मलबार हिल, मुंबई-४०००३५.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
३. मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
४. मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
५. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान भवन, मुंबई-४०००२१.
६. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधान भवन, मुंबई-४०००२१.
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
८. मा. अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
९. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय, मुंबई-४००००१.
१०. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, महाराष्ट्र पोलीस मुख्यालय, कुलाबा, मुंबई-४०० ०३९.
११. सर्व पोलीस आयुक्त.
१२. सर्व जिल्हा दंडाधिकारी.
१३. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक.
१४. सर्व आयुक्त, महानगरपालिका.
१५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१६. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७. संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, आरोग्य भवन, फोर्ट, मुंबई.

प्रत:-

१. आयुक्त अन्न व औषध प्रशासन, सर्व्हे क्र. ३४१, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, २रा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
२. प्रबंधक, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई, १८९-ए, आनंद कॉम्प्लेक्स, २रा मजला, साने गुरुजी मार्ग, आर्थर रोड नाका, चिंचपोकळी, मुंबई-४०००११.

३. प्रबंधक, महाराष्ट्र भारतीय औषध परिषद, २३१, कमिसरिएट बिल्डींग, ३रा मजला, खादी ग्रामोद्योग भवनच्या समोर, डी.एन. रोड, फोर्ट, मुंबई-४००००१.
४. प्रबंधक, महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद, २३५, पेनिन्सुला हाऊस, ३रा मजला, डी.एन. रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
५. निवड फाईल (अधिनियम).